**सं.फौ.ख.क्र.१११/२०२४**
**सरकार वि. संजय**
**नि.क्र.०९ च्या खाली**

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–शंकर जनार्धन राऊत,
वय ४५ वर्ष, व्यवसाय–शेती,
राह.शडेश्वर ता.उमरेड, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.एस.डी.काठोके यांच्या मार्फत शपथेवर सुरू</u>**

१. पोलिसांनी मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्याकामी शडेश्वर येथे बोलवले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा केला नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१०** देण्यात आले. आता मला झडतीपत्रक दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.११** देण्यात आले.

**<u>सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०/०१/२०२३ रोजी मौजा शडेश्वर येथे पोलिसांनी मला घटनास्थळावर पंचनामा करण्याकामी बोलविले होते व आरोपीच्या ताब्यातुन २० लिटर क्षमतेच्या दोन प्लास्टीक कॅनमध्ये अंदाजे ३० लिटर मोहाफुल दारू, चार काचेचे ग्लास व दोन प्लास्टीकचे मघे जप्त केले होते व माझ्यासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**
**<u>आरोपीतर्फे वकील श्री. एस.एच.शास्त्रकार यांनी उलटतपास नाकारला.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१३.०२.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड